मुख्यकार्यालय, विरार
विरार (पुर्व),
ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./आरोग्य/ २२८/२०२२
दिनांक : १७/ ०६/२०२२

# जाहिर दरपत्रक

याद्वारे पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन अधिनियम२०१६अंतर्गत घनकचरा खत निर्मिती प्रकल्प राबविणेकामी शहरातील उद्यानांसाठी Foldable Compost Bag (Size १२'x४'x२') खरेदी करणेबाबत इच्छुक व्यक्ती, संस्था व पुरवठादार यांचेकडुन दि. २८/०६/२०२२ रोजी दु. ०३.०० वाजेपर्यंत बंद पाकिटातुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| Sr. No. | Description | Qty | Price Per Unit | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Foldable Compost Bag (Size १२'x४'x२') | १५० | | |
| | | Total Amount | | |

## अटी-शर्ती

१. पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकावर वस्तु व सेवाकर नोंदणी (GST) क्रमांक असणे बंधनकारक राहिल.
२. मालकाचे/संस्थेचे GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आधार कार्ड, गुमास्ता परवाना (शॉप ॲक्ट परवाना) यांची छायांकित प्रत जोडण्यात यावे.
३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.
४. दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
५. दरपत्रकात नमुद वस्तुंचे/साहित्यांचे दर हे सादर करताना वाहतुक खर्च तसेच सर्व करांसहित सादर करण्यांत यावे.
६. कार्यादेश दिल्यानंतर ७ दिवसांचे आत काम करणे बंधनकारक राहील अन्यथा प्रति दिन १०० रु.दंड आकारण्यात येईल.
७. आपण पुरविलेल्या वस्तु ६ महिन्याच्या आत पुन्हा खराब झाल्यास आपणांस सदर वस्तुचा विनामोबदला पुरवठा करावा लागेल.
८. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांना राहिल.
९. वरिल अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.
१०. यासंबंधी दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दिनांक २८/०६/२०२२ रोजी दु. ०३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.
११. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २९/०६/२०२२ रोजी संध्या. ०३.४५ वाजता मा. उप-आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.
१२. दिलेल्या दरपत्रकामधील प्राप्त दरा व्यतिरिक्त इतर कोणत्याही अतिरिक्त देयकाची मागणी पुरवठादारास करता येणार नाही.
१३. दरपत्रक सादर करतेवेळी आपल्या एक वस्तू (Sample quality) नमूना गुणवत्तेसाठी देण्यात यावी.

स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार
दिनांक :- १७/०६/२०२२.

उप-आयुक्त
(घनकचरा व्यवस्थापन विभाग)
वसई विरार शहर महानगरपालिका

"E:\Sunil Ir\पत्रक\जाहिर दर पत्रक.docx"

Scanned with CamScanner